# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ : http://sus.ac.in ई-मेल : affiliation@sus.ac.in विस्तारित क्र.: १२२

NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)


## शैक्षणिक, संशोधन आणि विकास (संलग्नता विभाग)

### अत्यंत महत्वाचे परिपत्रक

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. २०१०/(२०/१०)/विशि-३, दिनांक ०८/१०/२०१०.
२) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/६६६/५६०३, दिनांक १४/१०/२०१०.
३) विद्यापीठ पत्र क्र. SOL/BCUD/AFFI/८५५/६६८८, दिनांक ११/११/२०१०.
४) विद्यापीठ पत्र क्र. SUS/VC/१७३, दिनांक २०/११/२०१३.
५) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/१८४४, दिनांक १९/०५/२०१४.
६) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३७८४, दिनांक २१/०७/२०१५.
७) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/३५२२, दिनांक ०६/०४/२०१६.
८) विद्यापीठ पत्र क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/७८६९, दिनांक १६/०८/२०१६.
९) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/२०१९/८२१५, दिनांक २५/१०/२०१९.
१०) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. अ.शा.क्र. के आर ए-२०२२/प्र.क्र.-१९६/वि, दिनांक १९/०७/२०२२.
११) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/१०१००, दिनांक २७/०७/२०२२.
१२) मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या पत्र क्र. विसस/उशि/सोविसो/२०२२/१५२८, दिनांक ०३/०८/२०२२.
१३) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/६२९७, दिनांक १८/०८/२०२२.
१४) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२२/नॅक/अशा. अनु.म.वि./औवि/मवि-३/१२२०२, दिनांक ०३/१०/२०२२.
१५) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/८६२३, दिनांक ०७/११/२०२२.
१६) मा. JBVC च्या संदर्भातील दिनांक ०५/०१/२०२३ रोजीच्या आढावा बैठकीतील मुद्दा क्र.१४.
१७) विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/१८०१, दिनांक १५/०३/२०२३.
१८) मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) संचालनालय, पुणे यांचे पत्र क्र. एनजीसी/२०२३/नॅक/अशा. अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६२, दिनांक २३/०५/२०२३.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासनाच्या संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठ प्रशासनाकडून संदर्भ क्र. २ ते ९, १३ व १५ येथील पत्रान्वये शासनाच्या धोरणानुसार महाविद्यालयाचे नॅक मूल्यांकन व पुढील Cycle नुसार पुनर्मूल्यांकन व मानांकन करुन घेण्याच्या दृष्टीने यापूर्वी वारंवार कळविण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि. ०४/०२/२०२३ रोजी मार्गदर्शनपर बैठकीमध्ये सर्व संलग्नित महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे अनिवार्य असल्याचे निर्देशित केले होते, ही बाब आपणांस संदर्भ क्र. १७ अन्वये कळविण्यात आलेली आहे.

सदर प्रकरणी मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांनी संदर्भ क्र. १८ अन्वये विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जे महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन, मानांकन व

पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीचा अवलंब करुन महाविद्यालयाची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठाने करणेबाबत आदेशित केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. यास्तव, आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १८ अन्वये मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार नॅक मूल्यांकन, मानांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

आपली स्नेहांकित,

03/6/23

( योगिनी घारे )

कुलसचिव

जा. क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/नॅक परिपत्रक/२०२२-२३/ 3557

दिनांक : 5 JUN 2023

प्रति,

**मा. प्राचार्य / संचालक ,**

सर्व संलग्नित महाविद्यालये,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.

www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९, Email: mavi.dhepune@nic.in

क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ ६४६२ दि.२३.०५.२०२३
23 MAY 2023

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय -अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

**संदर्भ** - १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२, १२२०४ दि.०३.१०.२०२२/६७८ दि.२५.०१.२०२३. व ३१७७ दि.२५.०१.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. संचालनालयाचे दि.०२ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील नॅक वैधता संपुष्टात आलेल्या महाविद्यालयांनी **"नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल" असे कळविण्यात आले होते.**

तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक कार्यालयास नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर केला नसल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे. उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

सबब, अद्यापपावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६ (ख) नुसार

(ख) **राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तीचे ते अनुपालन करीत नसतील तर,राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.**

**तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही."** अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, वर नमूद करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन,मानांकन व पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन आपल्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जे महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उपरोक्त नमूद सर्व तरतूदीचा अवलंब करुन महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी अशा महाविद्यालयांच्या प्रारंभ दिनांकापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालय निहाय संचालनालयास सादर करावा.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
**प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२

२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२